संगणक सांकेतांक- २०११०५२०१५३८२१००१

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-ल

वर्ष १, अंक ६५]   बुधवार, डिसेंबर २, २००९/अग्रहायण ११, शके १९३१   [पृष्ठे ७

किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक २३३

## प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ डिसेंबर २००९

## अधिसूचना

**किमान वेतन अधिनियम, १९४८.**

क्रमांक किवेअ. ८२००९/प्र.क्र. ११९८/कामगार-७.–किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) (यात यानंतर ज्याचा उक्त अधिनियम असा निर्देश करण्यात आलेला आहे.) हा महाराष्ट्र राज्यास लागू करण्यात आल्यानंतर त्याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) चा खंड (ब) अन्वये महाराष्ट्र राज्यातील " खाण्यास योग्य तंबाखू बनविण्याचा कामधंदा " (अनुसूचीच्या १ल्या भागातील ३ऱ्या नोंदीखाली न येणाऱ्या कामधंदा) अशा कोणत्याही व्यवसायातील रोजगारात कामावर असलेल्या कामगारांना देय असलेले किमान वेतन दर निर्धारित करण्याबाबतचा प्रस्ताव अंतर्भूत असलेली जी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केलेले आहे. त्या अधिसूचनेचा पुढील मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्यामुळे परिणाम होण्याच्या संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे, आणि त्याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** सदरहू अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त मसुदा विचारात घेईल.

उक्त मसुद्याच्या संबंधात उपरोक्त कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीकडून जे कोणतेही अभिवेदन कामगार आयुक्त, कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई ४०० ०३४ यांचेकडून येईल ते शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

## मसूदा अधिसूचना

क्रमांक किवेअ. ८२००९/प्र.क्र. ११९८/कामगार-७.–ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील " खाण्यास योग्य तंबाखू बनविण्याचा कामधंदा " (अनुसूचीच्या १ल्या भागातील ३ऱ्या नोंदीखाली न येणाऱ्या कामधंदा) अशा कोणत्याही उद्योगातील रोजगारात (यापुढे ज्याचा उक्त अनुसूचित रोजगार असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) कामावर असलेल्या कामगारांना देय असलेले किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.एमडब्ल्यूए-११२००२/सीआर-८९/कामगार-७, दिनांक २१ जून २००३ अन्वये पुनर्निर्धारित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने पुनर्विलोकन करून उक्त अनुसूचीत रोजगारातील कामगारांना देय असलेले किमान वेतन दर पुनर्निर्धारित करण्याचे ठरविले आहे.

ज्याअर्थी, आता किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) चा खंड (ब) आणि कलम ५ च्या पोट-कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक किवेअ. ८२००९/प्र.क्र. ११९८/कामगार-७, दिनांक २ डिसेंबर २००९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रस्तावाच्या संबंधात मिळालेली सर्व अभिवेदने विचारात घेतल्यानंतर आणि सल्लागार मंडळाचा सल्ला विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक          पासून उक्त अनुसूचित रोजगारात नोकरीत असलेल्या या सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतनाचे किमान दर निश्चित करीत आहे.

## अनुसूची

| अ. क्र. (१) | कामगारांची वर्गवारी (२) | मूळ किमान वेतन दर (दरमहा रुपये) (३) परिमंडळ-१ |
|---|---|---|
| १. कुशल | | ३,७०० |
| २. अर्धकुशल | | ३,२०० |
| ३. अकुशल | | २,९०० |

**स्पष्टीकरण**.— या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ,

(ए) **परिमंडळ-१.**–संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता

(बी) रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांस देय असलेले मजुरीचे किमान दर तो कामगार ज्या वर्गाचा असेल त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजुरीच्या दरांना २६ ने भागून येणारा भागाकार नजिकच्या पैशापर्यंत पूर्णांकात करून काढण्यात येईल.

(सी) किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल.

(डी) किमान वेतन दरामध्ये मूळ वेतन दर, विशेष भत्ता आणि सवलती असल्यास, त्यांचे रोख मूल्य यासाठी अनुज्ञेय असलेल्या सर्व दरांचा समावेश असेल.

(इ) एखादा कुशल कामगार म्हणजे जो स्वतःच्या निर्णय शक्तीनुसार आपले काम

कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार पाडू शकतो असा कामगार,

(एफ) अर्धकुशल कामगार म्हणजे सर्वसाधारणपणे नित्याच्या स्वरूपाचे काम करतो की, ज्यामध्ये निर्णय घेण्याची फारशी गरज नसते. परंतु तुलनेने त्याला दिलेले छोटेसे काम की, ज्यामध्ये महत्वाचे निर्णय इतरांकडून घेतले जातात असे काम योग्य रीतीने पार पाडण्याची आवश्यकता असते. मर्यादित व्याप्तीचे नित्याचे काम पार पाडणे हेच त्याचे कर्तव्य असते.

(जी) अकुशल कामगार म्हणजे ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र्य निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही. परंतु तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे. असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार, म्हणून त्याच्या कामासाठी शारिरीक परिश्रमाशिवाय निरनिराळ्या वस्तुंची किंवा मालाची त्याला चांगली माहिती असणे आवश्यक असेल.

## परिशिष्ट

महाराष्ट्र राज्यातील दहा केंद्रांचा सरासरी ग्राहक मूल्य निर्देशांक (नवीन मालिका १९८२=१००) हा उक्त अनुसूचीत रोजगारात नोकरीत असलेल्या कामगारांना लागू असलेला व राहणीमान निर्देशांक असेल, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी, १ जानेवारी आणि १ जुलै रोजी सुरू होणाऱ्या प्रत्येक सहामाहीच्या समाप्तीनंतर, त्या सहा महिन्यांसाठी उक्त कामगारांना लागू असलेल्या राहणीमान निर्देशांकाची सरासरी काढेल आणि ६५९ निर्देशांकावर अशा प्रत्येक अंकांच्या वाढीसाठी ज्या सहामाहीच्या संबंधात अशी सरासरी काढण्यात आलेली असेल, त्या सहा महिन्यालगत पुढील सहामाहीसाठी उक्त कर्मचाऱ्यांना देय असलेला विशेष भत्ता (यात यानंतर ज्याचा " राहणीमान भत्ता " असा निर्देश करण्यात आला आहे.) दरमहा रुपये ४.२५ या दराने असेल.

२. सक्षम प्राधिकारी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उपरोक्त प्रमाणे हिशोब करून काढलेला राहणीमान भत्ता जेव्हा जानेवारी ते जून या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये आणि जेव्हा जुलै ते डिसेंबर या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये जाहीर करील.

परंतु, सक्षम प्राधिकारी, किमान वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेला राहणीमान भत्ता, जून किंवा डिसेंबर अखेरपर्यंत किंवा यथास्थिती, किमान वेतन दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकानंतर लगेचच जाहीर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बा. शि. वानखेडे,**

शासनाचे उप सचिव.